
# याकोबाने स्वर्गात डोकावले

**प्रार्थना.** ''प्रिय प्रभु, जुन्या करारातील प्राचीन कुलाधिपतींचे धाडस व दिलेल्या पाठांबद्दल प्रशंसा करण्यास कृपा करून मुलांचे साहाय्य कर''

मुलांच्या वयोगटानुसार शिकविणाऱ्या पुढीलपैकी कोणत्याही कार्यकृती निवडा.

याकोबाला स्वप्न पडले. त्यात त्याने स्वर्गापर्यंत पोहंचविलेली शिडी आणि त्यावरून चढउतार करणारे देवदूत पाहिले (उत्पत्ती 28:12).



मोठ्या मुलांनी किंवा शिक्षकाने याकोबाची शिडी हा वृत्तांत उत्पत्ती 28:10-22 मधून वाचून दाखवावा. देवाने इस्राएलांच्या राष्ट्राच्या एका जनकाला याकोबाला स्वत:ला कसे प्रकट केले. हे यात सांगितले आहे.

वृत्तांत सांगून झाल्यावर पुढील प्रश्न विचारा (प्रत्येक प्रश्नानंतर उत्तर दिलेले आहे.)

- याकोबाने प्रवासात रात्री झोपतांना उशी म्हणून डोक्याखाली काय घेतले? (पाहा वचन 11)
- याकोबाला कोणते स्वप्न पडले? (वचन 12)
- प्रभूने याकोबाच्या संततीच्या संख्येविषयी काय अभिवचन दिले? (वचन 14)
- प्रभूने पृथ्वीवरील सर्व कुटुंबांसाठी कोण आशीर्वादित ठरेल असे सांगितले? (वचन 14)
- प्रभूने याकोबाला त्याच्या प्रवासासंबंधी कोणती खात्री दिली? (वचन 15)
- जाग आल्यावर याकोबाला भीती का वाटली? (वचन 16-17)
- देवाने दिलेल्या सर्व गोष्टींचा दहावा भाग देईन असे वचन याकोबाने कोणाला दिले? (वचने 20-22)

याकोबाचे स्वप्न ह्या वृत्तांताच्या भागांचे नाटयीकरण करा (उत्पत्ती 28:10-22).

- उपासेनच्या पुढाऱ्याशी चर्चा करून मुलांसाठी हे छोटे नाटुकले सादर करण्याची व्यवस्था करा.
- मुलांकडून नाटिकेची तयारी करून घ्या.
- तुम्ही सर्वच भूमिका केल्या पाहिजेत असे नाही.

- मोठ्या मुलांनी लहान मुलांची तयारी करण्यास मदत करावी.
- मोठ्या मुलांनी किंवा प्रौढांनी पुढील भूमिका कराव्यात:

  **याकोब.** एक धोंडा व लहान बाटली तयार ठेवा.

  **देवाची वाणी.**

  **निवेदक.** वृत्तांताचा सारांश तयार करा. आणि मुलांना संवाद पाठ करायला मदत करा.
- लहान मुलांना देवदूतांच्या भूमिका करायला द्या. त्यांना खुर्च्या किंवा शिडीसारखे काही तरी द्या.

**निवेदक:** उत्पत्ती 28:10-22 मधून वृत्तांत सांगून म्हणा, ''याकोब काय म्हणतो ते ऐका.''

**याकोब:** डोक्याखाली धोंडा घेऊन झोपा आणि म्हणा, ''रात्र फार झाली, प्रवासही बराच झाला, आता झोप घेतलीच पाहिजे.''

**देवदूत:** याकोबाजवळ 'शिडी' ठेवून त्यावरून चढउतार करा.

**देवाची वाणी:** (प्रत्येक अभिवचन मोठ्याने, सावकाश आणि स्पष्टपणे बोला) ''याकोब, मी परमेश्वर तुझा पिता इसहाक व आजोबा अब्राहामाचा देव आहे.''

''मी तुला पुष्कळ संतती देईन.

''मी तुझ्याद्वारे सर्व जग आशीर्वादित करीन.

''मी तुझी काळजी घेईन.''

**देवदूत:** शिडी घेऊन निघून जा.

**याकोब:** जागे व्हा. उठून उभे राहून म्हणा, ''काय अद्‌भुत स्वप्न होते! हे किती भयप्रद स्थळ आहे कारण येथे प्रत्यक्ष देव आहे! मी येथे स्मारकस्तंभ उभारतो.'' (उशाला घेतलेला धोंडा उचलून प्रत्येकाला दिसेल असा ठेवा. त्यावर बाटलीतले तेल ओतण्याचा अभिनय करा.) मग म्हणा, 'देवाने प्रवासात माझे रक्षण केले तर तो माझा देव होईल.''

**निवेदक:** नाटिकेसाठी मदत करणाऱ्यांचे आभार माना.

**प्रश्न.** मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर त्यांना वर दिलेले प्रश्न प्रौढांना विचारण्यास सांगा.

**मुलांना विचारा:** देव आणखी कोणत्या प्रकारांनी लोकांना स्वत:ची ओळख करून देतो प्रकट होतो? याची आणखी इतर उदाहरणे द्या. (मुलांना उदाहरणे सांगण्यास वेळ द्या).

शिडीचे चित्र काढा आणि मुलांना ते उतरवून घेण्यास सांगा. मुले त्यांची चित्रे उपासनेच्यावेळी मोठ्या माणसांना दाखवून आम्हाला दिसत नसला तरी देव आमच्या आजूबाजूना सर्वत्र आहे. हे स्वर्गात जाणाऱ्या शिडीच्या उदाहरणाने स्पष्ट होत, सांगतील.



**पाठ करा** इफिस. 5:20

''आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या नावाने सर्व गोष्टींबद्दल सर्वदा देवपित्याची उपकारस्तुती करीत जा.''

मोठ्या मुलांना देव त्याच्यावर भरवंसा ठेवणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी सतत, नेहमीच त्यांच्या बरोबर कसा असतो याविषयीची कविता किंवा गीत लिहिण्यास सांगा.

**कविता.** चार मुलांना स्तोत्र 139:7-10 ह्या मधून प्रत्येकी एक वचन म्हणायला सांगा.

मी तुझ्या आत्म्यापासून कोठे निघून जाऊ?
  मी तुझ्या समक्षतेपासून कोठे पळून जाऊ?
मी वर आकाशात चढलो तरी तेथे तू आहेस,
  अधोलोकी मी आपले अंथरूण केले तरी पाहा, तेथे तू आहेस.
मी पहाटेचे पंख धारण करून समुद्राच्या
  अगदी पलीकडल्या तीरावर जाऊन राहिलो,
तरी तेथेही तुझा हात मला चालवील,
  तुझा उजवा हात मला धरून ठेवील.

**प्रार्थना:** ''हे पित्या, तू स्वत: याकोबाला प्रकट झालास म्हणून आम्ही तुझे आभार मानतो. तू याकोबा प्रमाणेच सदोदित आमच्या बरोबर आहेस हे आम्हाला ठाऊक आहे. त्याच्याप्रमाणेच तुझ्यावर विश्वास ठेवण्यास आमचे साहाय्य कर. याकोबाच्या संततीद्वारे-येशूच्याद्वारे तू मला आणि प्रत्येकाला आशीर्वाद दिलेस याबद्दल तुला धन्यवाद.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net